

# प्रधानमंत्री पीक विमा योजना

UIN: IRDAN126P0001V01201617

## खरीप–२०१९

(भारत सरकार व महाराष्ट्र शासनाची योजना, एआयसी द्वारा लागू)

## विचार कराल पीक विम्याचा, विचार नेहमी एआयसीचा !!

महाराष्ट्रात अतिवृष्टी, अवकाळी पाऊस व दुष्काळ या सारख्या नैसर्गिक आपत्तिंमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. पीक विमा योजना अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना फायद्याची ठरली आहे.

## योजनेच्या प्रमुख बाबी

**विमा पात्र शेतकरी:** कर्जदार, बिगर कर्जदार, भाडेपट्टीवर शेती करणारे ई. सर्व शेतकरी.

**विमा संरक्षित बाबी:** नैसर्गिक आपत्तींपासून अधिसूचित क्षेत्र पातळीवर विमा संरक्षण. नुकसान भरपाई राज्य शासनाद्वारे केलेल्या पीक कापणी प्रयोगाच्या आधारित. चालू वर्षाचे सरासरी उत्पन्न उंबरठा उत्पन्नापेक्षा कमी नोंदले गेल्यास नुकसान भरपाई देय. हवामान घटकांच्या प्रतिकुल परिस्थितीमुळे पिकांची पेरणी किंवा लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान, पिकांच्या हंगामामध्ये हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे होणारे नुकसान, काढणी पश्चात नुकसान, अधिसूचित स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसानीस संरक्षण.

**विमा हप्ता व सबसिडी:** किफायतशीर विमा हप्ता, केंद्र व राज्य शासनामार्फत विमा हप्त्यामध्ये भरीव अनुदान.

शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता:– विमा संरक्षित रक्कमेच्या २%, नगदी व व्यापारी पिकांसाठी ५%.

**सहभाग प्रक्रिया:** अधिसूचित पीकांसाठी पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचा विमा बँकांमार्फत आपोआप केला जाईल. विमा हप्ता रक्कम ही कर्जाबरोबर अतिरिक्त मंजूर केली जाईल.

बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील विमा प्रस्ताव पत्रक पूर्णतः भरून, ७/१२, पीक पेरणी बाबत स्वयंघोषणा पत्र, आधार कार्ड व रोख विमा हप्त्यासह अंतिम मुदतीपूर्वी आपले बँक खाते असलेल्या जवळच्या बँक शाखेत अथवा सी.एस.सी. केंद्रात जमा करावे.

## बँक व सी.एस.सी. केंद्रामध्ये विमा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख:– २४, जुलै २०१९

**अधिसूचित पिके व विमा हप्ता दर :– भात, खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी, मका, तुर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, तीळ, सूर्यफूल, कारळे २%, कापूस, खरीप कांदा:– ५%**

त्वरा करा !! बँक शाखेत शेवटच्यादिवशी होणारी गर्दी टाळण्यासाठी आपल्या पिकांचा विमा अंतिम मुदतीच्या आधीच होईल ह्याची खात्री करा.

योजनेच्या अधिक महितीसाठी योजनेचे परिपत्रक व महाराष्ट्र शासनाची अधिसूचना वाचावी, **www.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध.

---


## एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड

मुंबई क्षेत्रीय कार्यालय: स्टॉक एक्सचेंज टॉवर्स, २० वा माळा, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०००२३.
मुख्य कार्यालय: प्लेट 'बी' आणि 'सी', पाचवा माळा, ब्लॉक १, ईस्ट किदवई नगर, नवी दिल्ली ११० ०२३.
e-mail:- ro.mumbai@aicofindia.com


आपली गाऱ्हाणी आमचे गाऱ्हाणी निवारण अधिकारी यांचे समोर मांडावी.(०२२-६१७१०९०५) अथवा लॉग ईन करा http://www.aicofindia.com/AICEng/Pages/Griavance_Home.aspx

निःशुल्क सहायता संपर्क क्रमांक १८००११६५१५


AICMRO/19-20/1A/PMFBY-KH19-01

CIN : U74999DL2002PLC118123


## संपन्न भारताची ओळख खरी – पिकांचा विमा आणि आनंदी शेतकरी!